SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

# विद्यार्थी विकास विभाग

Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/267 दि. २२/०१/२०२५

प्रती,
मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :– साहित्य लेखन २०२४ – २०२५ मुदत वाढ देणेबाबत.**
संदर्भ : या विभाचे जावक क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/२५६ दि. ०६/०१/२०२५ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ मधील शिवस्पंदन सांस्कृतिक स्पर्धेअंतर्गत खालीलप्रमाणे साहित्य लेखन स्पर्धा घेण्यात येणार आहेत. सदरची स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेत आयोजित करण्यात आली आहे.

१. कथा लेखन स्पर्धा
२. कविता लेखन स्पर्धा
३. नाटय लेखन स्पर्धा

सदरची स्पर्धा हि विद्यापीठातील अधिविभागामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आहे. उपरोक्त स्पर्धा मधून भाषा निहाय १ ते ३ क्रमांक काढण्यात येणार आहे. बक्षिस पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे रोख बक्षिस व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. सदर स्पर्धेचे बक्षिस वितरण शिवस्पंदन कार्यक्रमामध्ये करण्यात येणार आहे.

- प्रथक क्रंमाक – रु. १,५००/–
- द्वितीय क्रंमाक – रु. १,०००/–
- तृतीय क्रंमाक – रु. ७००/–

सदर स्पर्धेची नियमावली सोबत जोडली आहे. स्पर्धेचे लेखन साहित्य या विभागामध्ये दिनांक २२/०१/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत अधिविभागामार्फत जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तरी साहित्य लेखन पाठविण्यासाठी **दि. ०७/०२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे.**

कळावे,

आपला विश्वासू

22.01.25

संचालक
विद्यार्थी विकास

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

## कथा, कविता व नाटय लेखन स्पर्धा नियमावली

**स्पर्धेचे स्वरुप आणि अटी:**

१. सदर स्पर्धेसाठी प्रवेश विनामुल्य असेल.

२. स्पर्धेसाठी एका अधिविभागातील कितीही स्पर्धकास भाग घेता येईल.

३. कथालेखन शब्द मर्यादा ८०० ते १२०० शब्दांची असेल.

४. नाटयलेखन शब्द मर्यादा १२०० ते १५०० शब्दांची असेल.

५. कवितालेखन शब्द मर्यादा नाही.

६. साहित्यलेखनाची भाषा मराठी, हिंदी, इंग्रजी यापैकी राहिल.

७. साहित्यलेखन स्वरचीत असणे आवश्यक आहे.

८. **साहित्यलेखनामध्ये इतर लेखकाचे साहित्य अथवा इतरांचे लेखन जसेच्या तसे लिहिता येणार नाही यांची नोद घ्यावी.**

९. तज्ञांनी परीक्षण करुन ठरवलेल्या प्रथम तीन क्रमांकांनाच प्रमाणपत्र व रोख रक्कम बक्षिस म्हणून देण्यात येईल.

१०. सर्व सहभागी स्पर्धेकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

११. स्पर्धेत कोणत्याही शाखेचे विद्यार्थी सहभागी घेऊ शकतात.

१२. स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल व बक्षिस वितरण शिवस्पंदन कार्यक्रमामध्ये करण्यात येईल.

१३. साहित्य लेखन स्पर्धेचे परीक्षण नियुक्त तज्ञांकडून केले जाईल.

१४. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

**टिप: साहित्य लेखन स्पर्धेसाठी दि. ०७ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत साहित्य आपल्या अधिविभागामार्फत विद्यार्थी विकास विभागात जमा करावयाचे आहेत.**